# प्रेसनोट

जा.क्र. ७२९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २५/१०/२०१७

## '' खुनाचे गुन्हयात आरोपीस पाच वर्ष सश्रम कारावास व द्रव्यदंडाची शिक्षा''

**भंडारा** :– भंडारा जिल्हयातील पोलीस स्टेशन तुमसर अंतर्गत विवेकानंद नगर तुमसर ता. तुमसर जि. भंडारा येथील तक्रारदार पिडीत नामे हिजबुल रहेमान बसिर कुरेशी, वय ४५ वर्ष, याने दिनांक २२/०९/२०१५ रोजी तक्रार दिली की, दिनांक २१/०९/२०१५ ला दुपारी १२.०० वाजता तक्रारदार आपला ऑटो रिक्षा चालविण्याचा व्यवसाय करीत असता देव्हाडी रोडवर ऑटोमध्ये प्रवाशी भरत असतांना तुमसर येथील मतिन खान याने मागुन येवुन फिर्यादीचे ऑटोला मागुन धडक दिली त्याबाबत तक्रारदाराने धडक का दिली? असे चिवारले असता मतिन खान याने तक्रारदारा सोबत वादविवाद केला तेव्हा आजुबाजुचे परिचीतांनी वाद सोडविला.

तक्रारदार हा दिनांक २२/०९/२०१७ रोजी देव्हाडी येथुन तुमसर येथे आपले ऑटोमध्ये प्रवाशी घेवुन आला व आपला ऑटो स्टॅडवर लावला त्याठिकाणी तक्रारदाराचे ईतर ऑटो चालक मित्रांनी मतिन खान हा तुला सोधत आहे व तो तुला मारण्याकरीता लोखंडी रॉड घेवुन फिरत आहे तु येथुन निघुन जा व पोलीस स्टेशनला रिपोर्ट देण्यास सांगीतले असता तक्रारदार हा पोलीस स्टेशन ला जाण्यास निघाला असता मतिन खान याने दुचाकीवर येवुन तक्रारदाराचे डोक्यावर लोखंडी रॉडने जिवानीशि ठार मारण्याचे उद्देशाने मारले म्यामुळे तक्रारदार हा जागीच कोसळला व बेशुध्द झाला तक्रारदार यास दवाखाण्यात नेण्यात आले. त्याठिकाणी पोउपनि प्रविण गोपाल जाधव यांनी जख्यमीची तक्रार घेवुन आरोपी नामे मतिन हबिब खॉन पठाण, वय ४७ वर्ष, रा. तुमसर याचे विरुध्द पोलीस स्टेशन तुमसर येथे अप क्र. १०२/२०१५ कलम ३०७ भांदवि अन्वये गुन्हा नोंद करुन प्राथमिक तपास केला.

सदर गुन्याचा पुढील तपाससहा. पोलीस निरीक्षक अजित महादेव जाधव, पो. स्टे तुमसर यांनी सुरु केला व गुन्हयात **आरोपी नामे मतिन हबिब खॉन पठाण, वय ४७ वर्ष, रा. तुमसर** यास अटक केली. व तपास पुर्ण करुन आरोपी विरुध्द जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा येथे दोषारोपपत्र दाखल केले.

सदर गुन्हयाची सुनावणी मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश **श्री. संजय देशमुख** यांचे समक्ष चालली. गुन्हयात सरकार पक्षातर्फे **ॲडव्होकेट रमाकांत खत्री,** सहा. सरकारी अभियोक्ता सत्र न्यायालय भंडारा यांनी ८ साक्षदार तपासले. आज दिनांक २५/१०/०१७ रोजी गुन्हयात आरोपी नामे **मतिन हबिब खॉन पठाण, वय ४७ वर्ष, रा. तुमसर** यास कलम ३०७ भांदवि अन्वये दोषी ठरवुन **पाच वर्ष सश्रम कारावास व १०,०००/—रुपये दंडाची शिक्षा सुनावली,** सदर गुन्हयात पोलीस नाईक यशवंत हलमारे, ब. न. ७७१ पोस्टे तुमसर यांनी पैरवी अधीकारी म्हणुन कामकाज केले.

**(कृपया समोरच्या पहील्या पानावर देण्यास विनंती)**

25.10.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा (म.रा.)

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता